Vol. 1, Issue II / March 2011, pp.65-68

Research Paper - Economics

# भारताचा ग्रामीण विकासातील अवरोध

प्रा. मदनुरे व्यंकटेश काळूराम
चांदमल ताराचवंद बोरा महाविद्यालय, शिरूर, पुणे.

भारतीय अर्थव्यवस्था जगातील सर्वात मोठया अर्थव्यवस्थेतील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. महासत्ता होण्याच्या मार्गावर असणा—या अर्थव्यवस्थेत चीन नंतर भारताचाच क्रमांक लागतो. भारतीय नियोजन कर्त्यांना देखील भारत 2020 पर्यंत महासत्ता बनेल अशी अपेक्षा आहे. भारताने स्वातंत्र्यानंतर 1951 पासून पंचवार्षिक योजनाच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. साधारणतः 1951 ते 1980 या तीस वर्षाच्या कालावधीत भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दर सरासरी 3.5 टक्के एवढा अर्थात अतिशय कमी होता म्हणून या वृदधी दरास उपहासात्मकरित्या 'हिंन्दू वृदधी दर' असे म्हटले जाते. 1980 नंतर मात्र आर्थिक धोरणात बदल करण्यासंदर्भात विचार करण्यात येऊ लागला आणि 1991 च्या आर्थिक संकटाने त्या नवीन आर्थिक धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली. पुर्वी विकासाची व्युहरचना अंतर्मुख होती आणि तिचा भर हुकूमत व नियंत्रणयुक्तता राहण्यावर होता पण 1991 च्या नंतर विकासासाठी बहिर्मुख व्युहरचना स्वीकारण्यात आली आणि बाजार यंत्रणेवर आधारीत प्रोत्साहात्मक सुधारणांवर भर देण्यात आला. परिणामी विकासाचा दर 8 टक्के पर्यंत वाढण्यात योजनाकारांना यश प्राप्त झाले.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वृदधी दर वाढला याचा अर्थ संपूर्ण अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर अग्रेसर आहे असे समजणे चुकीचे ठरते. कारण नियोजन काळातील कृषि क्षेत्राच्या उत्पादनात मोठया प्रमाणात वाढ झाली असली तरी कृषी क्षेत्राच्या वृदधी दरात मात्र समाधानकारक वाढ होऊ शकली नाही. उदयोगक्षेत्रातील वृदधी दर कायम राहीला तर सेवा क्षेत्राच्या वृदधीदरात मात्र मोठया प्रमाणात वाढ झाली.

भारत हा खेडयांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतातील 70 टक्के जनता ग्रामीण क्षेत्रात राहते व 58 टक्के जनता शेती क्षेत्राशी निगडीत आहे. अशा अर्थव्यवस्थेचा कणा समजल्या जाणा—या क्षेत्राचा विकास मंद गतीने होणे म्हणजे बहुसंख्य लोकांच्या विकासाकडे पाठ वळवून केवळ काही क्षेत्राच्या विकासातून भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास करण्याचे दिवा स्वप्न पाहणे हे अतिशय खेळकर वाटते. जोपर्यंत भारतातील शेती क्षेत्राचा व ग्रामीण क्षेत्राचा विकास होत नाही तोपर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेचा खरा विकास झाला असे म्हणता येत नाही.

आर्थिक विकासासाठी देशातील सर्व भागात कार्यक्षम व परवडतील अशा पायाभुत सुविधांच्या सेवेची उपलब्धता असणे अतिशय आवश्यक आहे. परंतू भारतातील ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा अभाव दिसून येतो. त्यामुळेच ग्रामीण क्षेत्राच्या विकासात अनेक अडथळे निर्माण झाले आहेत. ग्रामीण क्षेत्रातील पायाभुत सुविधांच्या अभावामुळेच लहान—मोठे उद्योजक ग्रामीण क्षेत्राकडे येण्यास उत्सुक नसतात. एवढेच नाहीतर ग्रामीण क्षेत्रातच वाढलेला उच्चशिक्षित तरुण वर्ग ग्रामीण क्षेत्रात कार्यरत होण्यास निरुत्साही दिसून येतो. शासनाने ग्रामीण क्षेत्रात खाजगी गुंतवणूक वळवण्यासाठी विशेष प्रोत्साहन दिल्यास यामुळे ग्रामीण क्षेत्राच्या विकासाला मोठया प्रमाणात चालना मिळेल.

भारतात नियोजन काळात पायाभुत सुविधांच्या विकासावर करण्यात आलेला खर्च हा एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) सरासरी 4 टक्के ते 5 टक्के पर्यंतच राहीला. 1991 च्या पुर्वी पायाभुत सुविधांच्या विकासाची जबाबदारी सार्वजनिक क्षेत्रावर टाकण्यात आली. निकृष्ट दर्जाचे व्यवस्थापन व अयोग्य मूल्यांकनामुळे या काळात भारताच्या विकासासाठी आवश्यक असणारी पायाभुत संरचना देशात निर्माण होऊ शकली नाही. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यामध्ये जबाबदारीची विभागणी झाल्यामुळे सुद्धा पायाभुत सुविधांच्या व्यवस्थापणात अडथळे निर्माण झाले आहेत. वीज व पाणी यासारखे विषय राज्य शासनाच्या अखत्यारीत येतात. राज्य सरकार आपल्या कुवतीप्रमाणे या घटकांच्या विकासासाठी गुंतवणूक करु शकते. या कालावधीत पायाभुत सुविधांच्या मागणीत मोठया प्रमाणात वाढ झाली त्या प्रमाणात पुरवठा करण्यात सार्वजनिक क्षेत्र अपयशी ठरल्याचे लक्षात येताच सन 1991 नंतर पायाभुत सुविधांच्या विकासासाठी खाजगी क्षेत्राचे सहाय्य घेण्यात येऊ लागले.

भारतात ऊर्जा क्षेत्रातील तुटवडा सुद्धा भारताच्या सार्वजनिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण असफलतेपैकी एक महत्वाचा घटक आहे. भारतातच नव्हे तर सर्व आशियाई देशामध्ये ऊर्जेची टंचाई व व्यवस्थापनातील दोष हा प्रमुख समस्या अस्तित्वात असलेले आढळते. भारतात दुर्बल व अकार्यक्षम संस्थाद्वारे वीजेचा पुरवठा केला जातो. उर्जासाधनांच्या किंमतीवर सरकारचे नियंत्रण व निकृष्ट दर्जाचे व्यवस्थापन यामुळे हा प्रश्न अधिकच बिकट बनत गेला आहे.. भारतात वीज निर्मिती करणा—या कंपनीला वीज चोरीमुळे मोठया प्रमाणात तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे कंपनीची आपल्या स्वतःच्या साधनसंपत्तीमधून गुंतवणुकीसाठी आर्थिक व्यवस्था निर्माण करण्याची क्षमता क्षीण होत गेली. अशा कंपन्यांना शासनाकडून मोठया प्रमाणत अर्थसहाय्य केले गेले. परंतू अशा उपाययोजनांना मर्यादित प्रमाणातच यश मिळाले .

ग्रामीण क्षेत्रातील वाहतूक व परिवहन साधनांच्या बाबतीत सुध्दा निराशाजनक स्थिती दिसून येते. नियोजनाच्या सुरुवातीच्या काळात ग्रामीण भागाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रस्ते जोडणीवर भर देण्यात आला. परंतू पर्याप्त निधीच्या अभावाने हे काम पुर्ण होऊ शकले नाही. याकाळात महामार्ग सुधारणेवरचे लक्ष मर्यादीत होते. अगदी अलिकडील काळात आंतरराष्ट्रीय सहाय्याने भारताने माहमार्ग क्षेत्राच्या विकासात गुंतवणुक वाढवण्यास सुरुवात केली पण हे शक्य नाही. असे लक्षात येताच या क्षेत्राचे खाजगीकरण करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यामुळेच देशात टोल प्रवृत्ती वाढताना दिसून येते. या व्यवस्थेत देखील अनेक प्रकारच्या अडचणी असल्यामुळे भारतातील रस्त्यांचा पर्याप्त प्रमाणात विकास होऊ शकला नाही. रेल्वेबाबत अयोग्य व्यवस्थापन आवश्यकतेपेक्षा अधिक मनुष्य भरती, राजकीय हस्तक्षेप, सुरक्षेसंबंधीचे प्रश्न अशा अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

भारतातील ग्रामीण क्षेत्रात वाहतूक व परिवहन साधनांचा विकास झालेला नसल्यामुळे ग्रामीण विकासात गतिरोध निर्माण होत आहे. वाहतुक व परिवहन साधनांच्या अभावामुळे भारतीय शेतकरी निर्यातक्षम कृषिमालाचे उत्पादन मोठया प्रमाणात घेऊ शकत नाहीत. कारण नाशवंत वस्तूंना अल्पकाळातच बाजारपेठ उपलब्ध होणे आवश्यक असते. त्यामुळे शेतक—यांच्या उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होत नाही. त्यांना अधिक उत्पादन घेण्यासंबंधी प्रेरणा मिळत नाही. याचाच परिणाम की, भारतीय शेतकरी आधुनिक तंत्र व पद्धती लवकर स्विकारत नाही. पारंपारिकतेला चिकटून राहण्याचा प्रयत्न करतात.

भारतातील जलसंपदेबाबत देखील अनेक समस्या आहेत. भारत वाढत्या लोकसंख्येचा देश म्हणून ओळखला जातो. किती आश्चर्याची बाब आहे की, भारतात गंगा आणि गोदावरी सारख्या नदया असून सुद्धा भारतातील जनता

तहानलेलीच आहे. पाणी मानवी जीवन जगण्यासाठी, कृषी उत्पादन वाढवण्यासाठी, औद्योगिक उत्पादनासाठी आवश्यक असणारा नैसर्गिक घटक होय पण भारतात पाण्याचे योग्य व्यवस्थापन नसल्याने अनेक भागात पाण्याची टंचाई निर्माण होते. पाणी पुरवठयाचा विषय राज्य शासनाच्या अखत्यारीत येतो. राज्य शासनाच्या पाण्याबाबतीत निकृष्ट व्यवस्थापनामुळे अनेक गंभीर समस्या निर्माण होत आहेत. शेतक–यांना अर्थसहाय्यावर मोठया प्रमाणात विजेचा पुरवठा केल्याचा परिणाम म्हणजे पाण्याचा अतिरेक वापर होय. भारतातील एकुण लागवडीखाली असणा–या क्षेत्रापैकी 60 टक्के क्षेत्रावर जलसिंचन सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे हे क्षेत्र मान्सुनच्या लहरीपणावर अवलंबून असते. परिणामी भारतीय कृषी उत्पादनात मोठया प्रमाणात चढ–उतार होतो. याचाच परिणाम वस्तूंच्या किंमतीवर होतो याचे अलिकडचे उदाहरण म्हणून 'कांदयांचा' उल्लेख करता येईल.

पाण्याच्या वाटपासंदर्भात अनेक राज्यामध्ये मतभेद निर्माण झालेले आहेत. उन्हाळयाचे चार महिने काही गावांना टॅन्करने पाणी पुरवठा करावा लागतो तर काही दुर्गम भागात पाण्यासाठी नागरीकांना 3 ते 4 किलो मीटर पायपीट करावी लागते. पावसाळयाचा विचार केल्यास या काळात शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही म्हणून या काळात साथींच्या रोगांचे प्रमाण वाढते व या काळात आरोग्य व्यवस्थेवर अतिरिक्त ताण निर्माण होतो. ग्रामीण भागात व शहरी भागातील झोपडपट्टयामध्ये सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन नसल्यामुळे या भागात अनेकप्रकारचे साथीचे रोग निर्माण होतात. यातून आरोग्य विषयक समस्या तीव्र स्वरुप धारण करते.

भारताच्या ग्रामीण विकासातील आणखी एक प्रमुख अडथळा म्हणजे भारतीय जनतेतील कौशल्याचा अभाव होय. 2001 च्या जनगणनेनुसार भारतातील जवळपास 35 टक्के जनता निरक्षर आहे.. ज्यांना काहीच लिहीता वाचता येत नसेल त्यांचे कडून कोणत्याही विशेष कौशल्याची अपेक्षा करणे व्यर्थ ठरते. तरी अलिकडील काळात कामगार वर्गाच्या शैक्षणिक पातळीत सुधारणा होत असल्याचे चित्र दिसून येते असले तरी विकसीत देशातील कामगारांच्या तुलनेत भारतीय कामगारांची कार्यक्षमता व उत्पादकता अतिशय कमी आहे. भारतात शिक्षणाच्या विस्तारासाठी करण्यात येणा–या खर्चाचे प्रमाण इतर विकसीत देशाच्या तुलनेत अतिशय कमी आहे .

भारतीय शिक्षण पद्धतीकडे पाहिल्यास या शिक्षण पद्धतीने अलिकडील काळात भारतात ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था निर्माण करण्यास जरी सहाय्य केले असले तरी शिक्षणाचा दर्जा वाढवण्यास मात्र ही पद्धती अपयशी ठरली असे म्हणता येते. भारतात शैक्षणिक संस्थांची सुरुवात सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने झाली परंतू पुढील काळात शैक्षणिक संस्थाचे परवाने राजकीय कार्यकर्त्यांना खिरापतीप्रमाणे वाटण्यात आले म्हणून शैक्षणिक क्षेत्रात शिक्षण सम्राटांचे वर्चस्व निर्माण झाले. यानंतरच्या काळात शासनाने शैक्षणिक विकासाची जबाबदारी खाजगी क्षेत्राकडे सोपवली यातून शैक्षणिक दर्जा व गुणवत्ता वाढीचा आणि समाजकल्याणाचा हेतू बाजूला राहिला व नफेखोरीची प्रवृत्ती वाढीस लागली. या व्यवस्थेतून चांगले व गुणवत्तापुर्ण शिक्षण घेणे गरिबांच्या आवाक्यातील बाब राहिली नाही.

भारतातील श्रम बाजारातील लवचिकता वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील तसेच शिक्षणावरील खर्च वाढवावा लागेल व स्वातंत्र्यापासून उच्च शिक्षण अभिमुख असणाऱ्या शैक्षणिक धोरणात बदल करुन किमान कौशल्यावर आधारित शिक्षणपद्धती विकसीत करणे आवश्यक आहे. अशा शिक्षण पद्धतीतून निर्माण होणाऱ्या श्रमसंख्येस रोजगार उपलब्धता करुन

देण्यासंबंधीचे नियोजन करण्यात आले तर भारतातील बेरोजगारीच्या समस्येची तीव्रता कमी करता येईल. भारतीय शेतीक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अकुशल श्रमिकांच्या गटाला प्रशिक्षण देऊन त्यांच्यात कौशल्य निर्मीतीसाठी प्रयत्न होणे देखील आवश्यक आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळून आज 63 वर्ष पूर्ण झाली तरी स्वातंत्र्याची गंगा अजून गरीबांच्या झोपडीपर्यंत पोहचली नाही. ग्रामीण क्षेत्रातील अठराविश्व दारिद्रय आणखी पहायला मिळते. भारताने जागतिकीकरणाचा स्विकार केला असेल किंवा आणखी कोणत्या धोरणाचा स्विकार केला याचे या जनतेला काहीही देणे घेणे नाही. त्यांना केवळ आपल्या श्रमाच्या बळावर दोन वेळची भाकर मिळेल का?एवढीच चिन्ता वाटते. आपण भारताच्या विकासासंदर्भात किंवा महासत्ता होण्यासंदर्भात कितीही स्वतःची पाठ थोपटून घेत असलो तरी भारताचा खरा विकास तोपर्यंत होणार नाही जो पर्यंत 'इंडिया' आणि 'भारत' या संकल्पनातील अंतर नाहीसे होणार नाही.

## संदर्भ सूची :–


1. रुद्रदत्त के.पी.एम. सुंदरम :– 'भारतीय अर्थव्यवस्था' एस.चन्द ॲन्ड कं. नवी दिल्ली 2007.
2. एस.के. मिश्र आणि व्ही.के.पुरी :– 'भारतीय अर्थव्यवस्था' हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई 2007.
3. प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ :– 'भारतीय अर्थव्यवस्था' सस्केस पब्लिकेशन, पुणे 2006.
4. डॉ. मधुसूदन साठे :– 'भारतीय विकास आणि नियोजन' डायमंड पब्लिकेशन, पुणे 2008.
5. डॉ. मधुसूदन साठे :– 'आर्थिक सुधारणा आणि वाढ' डायमंड पब्लिकेशन, पुणे 2008.
6. प्रा.शरद शंकर जोशी :– 'भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल' डायमंड पब्लिकेशन, पुणे 2007.
7. सादिक अहेमद :– 'भारताचा दिर्घकालीन विकास अनुभव' डायमंड पब्लिकेशन, पुणे 2007.
8. कुरुक्षेत्र मासिक (हिन्दी) फेब्रुवारी 2008.
9. योजना मासिक (हिन्दी) सप्टेंबर 2009.